रेवण जाधव

# अहं



# अहं

## एका लेखकाचा

रेवण जाधव

ई साहित्य प्रतिष्ठान

# अहं एका लेखकाचा

रेवण जाधव

Email :- jadhavrevan@rediffmail.com

Ph : 09370522501

इमारत क्र. २३, घर क्र. ५८२, एम.आय.जी., कॉलनी, गोखले नगर, शकुंतला निकम उद्यानाजवळ, पुणे ४११०१६. मोबाईल

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन :३१ जुलै २०१७



©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

माझ्या लिखाणाला दाद देणाऱ्या सर्व वाचकांना समर्पित.

रेवण जाधव



**या कथेतील सर्व पात्रे व प्रसंग काल्पनिक आहेत**

**याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.**

# अहं

आज ३ सप्टेंबर म्हणजे माझ्या मुलीचा, अंकिताचा ७ वा वाढदिवस. घरात पाच महिन्यानंतर थोडेसे चैतन्यदायी, आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. खास तिच्या आग्रहाखातर आमचा फॅमिली फोटो असलेला केक बनवून घेतलाय. तिच्या शाळेतल्या मैत्रिणी आणि काही निवडक मित्र, माझे अगदी जवळचे नातेवाईक, सासरची मंडळी आणि शेजारी अशा फक्त ५० जणांनाच आमंत्रण आहे आजच्या कार्यक्रमाचे. इतर वेळेसारखी जंगी पार्टी नाही की धमाल नाही. सगळं मिळमिळीत.

अंकिता सकाळीच नवीन कपडे घालून शाळेत गेली आहे आणि मी रोजच्या प्रमाणे खिडकीपाशी ती येते त्या रस्त्याकडे नजर लाऊन बसलोय...

.... व्हील चेअर मध्ये.

साधारण पाच महिन्यांपूर्वी आमच्या सोसायटीच्या गेटमध्ये मी गाडीवर बसून मोबाईल वरून बोलत असताना कुणीतरी माझ्यावर मागून गोळीबार केला आणि त्या दोन्ही गोळया वर्मी घाव करून गेल्या. त्यामुळे माझ्या शरीराचा डावा भाग बऱ्याच प्रमाणात निकामी झाला आणि मी कायमस्वरूपी व्हील चेअर मध्ये बंदिस्त झालो. हालचाली बरोबर बोलण्यात सुद्धा परिणाम झाला. उच्चार स्पष्ट राहिले नाहीत.

पण त्यापूर्वी मी असा नव्हतो. मराठी चित्रपट क्षेत्रात नावाजलेला लेखक म्हणून माझी ओळख होती. अनेक प्रसिद्ध सिने कलावंत, राजकीय व्यक्ती आणि सामाजिक संस्थांबरोबर माझे संबंध होते. मी लिहिलेल्या कथेवर आधारित पहिल्या दोन मराठी सिनेमांनी निर्मात्यांना अपेक्षेपेक्षा जास्त नफा मिळवून दिला. त्या नंतर तर मला दिग्दर्शन करण्याची सुद्धा संधी मिळाली. लेखक आणि दिगदर्शक मीच म्हटल्यावर पुढचा सिनेमा सुद्धा प्रेक्षकांच्या पसंतीला उतरला आणि त्याने पैसा वसूल धंदा केलं.

फक्त सिनेमाच नाही तर मी वृत्तपत्रांमधून जे लेखन करत होतो त्यालादेखील वाचक दाद देत होते. ऑनलाईन पेपर वाचणारे तर कमेंट मधून माझे इतके कौतुक करत होते की मी ‘आता अजून का लिहू?’ असा प्रश्न पडू लागला.

तर मी रोहन जगताप, वय ३६ वर्षे, राहणार गोखले नगर, पुणे. माझ्या लेखक जीवनाची सुरुवातच झाली ती एका शाळेविषयी लिहिलेल्या लेखातून.

त्या वेळी, म्हणजे २०१३ साली मी एका सामाजिक संस्थेच्या शिक्षण विभागाच्या संघाचा एक भाग (टायपिस्ट) म्हणून काम करत होतो. जानेवारी २०१३ मध्ये आमची टीम एका आदिवासी शाळेला भेट देऊन आली, मी सुद्धा गेलो होतो. परत आल्यावर त्या शाळा भेटीविषयी अहवाल सादर करायचा होता.

तो अहवाल मी आकडेवारी, सन-सनावळ यांचा वापर करून लिहिला. सोबतच तिथल्या निसर्गाचे वर्णन, शाळेमध्ये मुलांना शिकवण्यासाठी वापरले जाणारे नैसर्गिक घटक, शिक्षकांची शिकवण्यातली आत्मीयता, मुलांचे शाळेविषयी असलेले प्रेम, पालकांना शिक्षणाचे पटलेले महत्व इत्यादी गोष्टींचा मी अतिशय सुंदर शब्दांत केलेला उल्लेख यामुळे तो अहवाल सर्वांना आवडला आणि मंथली मिटिंगमध्ये त्याचे वाचन झाले. मग आमच्या डायरेक्टर मंजिरी मॅडम यांनी तो अहवाल पुण्याच्या एका प्रसिद्ध वर्तमानपत्राच्या एका सदरासाठी पाठवून दिला आणि आश्चर्य म्हणजे आकडेवारीचा भाग वगळता तो अहवाल एक छान लेख म्हणून छापून आला.

ऑफिस, नातेवाईक, मित्र, ओळखीचे अशा कित्येक जणांचे अभिनंदन मी नंतर कित्येक दिवस प्रत्यक्ष किंवा मोबाईलवरून स्वीकारत होतो.

मी लिहू शकतो हा आत्मविश्वास मला मिळाला आणि मग मी एक कथा लिहिली 'फॉर एव्हरी डॉटर'. यात मी माझ्या ओळखीच्या एका बलात्कार पिडीत मुलीला कशी मदत करतो, याबद्दल लिहिले. ही कथा नवोदित मराठी लेखकांसाठी असलेल्या वेबसाईट वरून प्रकाशित केली. पुन्हा एकदा प्रशंसा आणि कौतुक सोहळा.

त्यानंतर काही दिवसांनी मला मुंबईवरून एका सिनेमा दिग्दर्शकाचा फोन आला. माझी कथा आवडली आणि त्यावर आधारित सिनेमा बनवण्याची इच्छा त्याने व्यक्त केली. मी लगेच “हो” म्हणालो. सुरुवातीला रू. ४५,०००/- आणि सिनेमाने चांगला बिजनेस केला तर अजून काही रक्कम देण्याचे त्या दिग्दर्शकाने आश्वासन दिले. मी एक मध्यमवर्गीय माणूस एक रकमी इतके पैसे मिळाल्याने पार हुरळून गेले. सिनेमाने अपेक्षेपेक्षा खूप चांगला बिजनेस केला आणि मला पुन्हा तितकेच पैसे मिळाले. एका कथेसाठी जवळजवळ एक लाख रुपये मिळाल्याने आता मी नोकरी सोडून देण्याचा विचार सुरु केला.

आपण चांगले लिहितो, ते लोकांना आवडते आणि त्यातून भरपूर पैसे कमवता येतात या अनुभवामुळे माझे आयुष्य पुरते बदलले. आणि महिन्याभराच्या नोटीस पिरीयड नंतर मी नोकरी सोडून दिली. आता लिखाण करायचे पण कागदावर नाही तर कम्प्युटर वर हा विचार करून मी एका मित्राकडे त्याविषयी चौकशी केली. तर त्याने कम्प्युटर ऐवजी laptop घेण्याचा सल्ला दिला. 'कधीही, कुठेही वापरता येतो आणि किंमत सुद्धा जवळपास सारखीच असते', त्याचे हे म्हणणे मला पुरते पटले.

आणि मग सुरुवात झाली माझ्या विचारांची एक अशी साखळी जी दिवसेंदिवस वाढतच होती. आज एक विचार तर उद्या दुसरा. कुठल्याही विषयावर कथा लिहायची माझी तयारी झाली. वेळ भरपूर होता आणि हाताशी laptop मग काय मी फक्त लेखन करत सुटलो.

दुसरीकडे बायको आणि मुलगी पण खुश. त्यांच्या फिरण्याच्या आणि खाण्याच्या सगळया फर्माईशी मी पूर्ण करत होतो. मुलगी शाळेतून घरी आली आणि दुपारचे जेवण उरकून थोडी विश्रांती की संध्याकाळी कुठल्यातरी बागेत जायचे. कधी-कधी रात्रीचे जेवण हॉटेलमध्ये. रविवारी तर सिंहगड, केतकवळयाचा बालाजी, प्रती शिर्डी, कात्रजची बाग तर कधी अप्पूघर या ठिकाणी आम्ही तिघे गाडीवरून गेलो होतो. बायकोला पाहिजे तेव्हा तुळशीबागेत नेले. एकूणच मज्जाच मज्जा.

मला एक कथा लिहायला दोन ते तीन दिवस पुरायचे. मी लिहिलेली दुसरी कथा ही एक प्रेमकथा होती एका जुन्या हिंदी चित्रपटाचा मराठी मेकओव्हर. मी त्या पूर्वीच्याच दिग्दर्शकाशी संपर्क साधून कथा ई-मेल वरून पाठवून दिली. पण यावेळी त्यांची मागणी वेगळी होती. त्यांना ही फक्त कथा नको होती तर ती सिनेमाच्या स्क्रिप्टच्या स्वरूपात हवी होती. मी त्यासाठी क्लास करायचे ठरवले. पण दिवाळीच्या सुट्टीमुळे माझा तो महिना वाया गेला. नंतर मात्र एक महिन्याचा स्क्रिप्ट राईटिंगचा कोर्स मी केला. आणि ही कथा पुन्हा नव्याने लिहून काढली आणि ई-मेल वर पाठवून दिली.

हा सिनेमा देखील प्रेक्षकांच्या पसंतीला उतरला. आणि मला पुन्हा एकदा चांगली किंमत मिळाली.

मी आता हाच छंद व्यवसाय म्हणून निवडला. व्हिजिटिंग कार्ड छापून घेतले. माझे कोर्सचे सर्टिफिकेट आणि कार्ड स्कॅन करून फेसबुक आणि whatsapp वरून लोकांपर्यंत पोहोचवले. इन्टरनेटच्या माधमातून जाहिरात केली. त्याच वर्षी गणपती उत्सवा दरम्यान एका कंपनीने बाटलीबंद पिण्याचे पाणी बाजारात आणले होते. मी वर्षाच्या शेवटी त्यांना संपर्क केला. त्यांच्या पाण्याच्या जाहिरातीसाठी एक थीम लिहून दिली. आणि मग शॅम्पूच्या एका कंपनीला सुद्धा एक जाहिरात लिहून दिली. कमी कष्ट करून, आपल्या वेळेनुसार काम करून भरपूर पैसे कमावायला सुरुवात झाली.

त्यामुळे मी गोखले नगर मध्ये आता मानाची व्यक्ती बनलो आणि लोक येता जाता हाक मारून ओळख देऊ लागले. त्यातल्या काही जणांसाठीच मी गाडी थाम्बवायचो, बाकीच्यांना फक्त हात दाखवून पुढे जायचो.

एकदा कमला नेहरू बागेमध्ये अंकिता झोका खेळत होती, तिची मम्मी तिच्या सोबत आणि मी जॉगिंग track वर फेऱ्या मारत होतो. थोड्या वेळाने त्या दोघी भेळ घ्यायला बागेच्या बाहेर गेल्या आणि परत येऊन एका बेंच वर बसून भेळ खाऊ लागल्या. मी सुद्धा त्यांच्या सोबत बसलो. तेव्हा माझ्या उजव्या बाजूच्या बेंच वर एक मुलगा त्याच्या बायको सोबत बसून भेळच खात होता. तो माझ्या बघण्यातला होता. त्याने मला पाहून हसून ओळख दाखवली. मी सुद्धा हसून त्याला प्रतिसाद दिला. मी अंदाज लावला त्याचे नुकतेच लग्न झालेले असावे आणि संध्याकाळी बायको सोबत तो फिरायला या बागेत आला असावा.

थोडा वेळ गेल्यानंतर तो माझ्या जवळ येऊन उभा राहिला आणि म्हणाला, “तुमच्याशी थोडं बोलायचं”.

मी त्याच्यासोबत जवळच्या एका झाडाखाली उभा राहिलो. त्याने मला सांगितले कि, त्याचे ४ महिने आधी लग्न झाले. पण त्याला बायकोसोबत बोलायला, बसायला अगदी झोपायला सुद्धा पुरेसा एकांत मिळत नाही. त्याच्या बहिणीची ३ वर्षांची मुलगी गेले एक वर्ष त्यांच्या सोबतच रहाते आहे. तिच्यामुळे आणि घरातल्या इतरांमुळे या दोघांना अवघडल्यासारखे वाटते. यावर काही उपाय करता येईल का?

मी त्याला दोन दिवसांनंतर माझ्या घरी येऊन भेटायला सांगितले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आमच्या घरी येणाऱ्या धुणेवाल्या बाईनी मला रू. १०००/- उसने मागितले. मी बायको कडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. त्यावर बायकोने होकारार्थी मान हलवली आणि मी त्या बाईना पैसे दिले.

माझे नातेवाईक किंवा माझ्याशी संबंधित कोणीही घरी आले की मी समजून जायचो की त्यांना पैसे पाहिजेत म्हणून ते माझ्याकडे आले आहेत. कारण गेल्या दिड ते दोन वर्षांमध्ये मी सतरा लाख रुपये कमावले होते. मग काय कुणाच्याही अडचणीच्या वेळी मी मदत करत होतो, पैशांची.

बागेत भेटलेला तो मुलगा दिलेल्या दिवशी ठरलेल्या वेळी घरी आला. मी त्याला म्हणालो, “तुझी बहिण भिकाऱ्याला तर नाही दिलेली ना? जर त्यांना मुलीचा सांभाळ करता येत नाही तर त्यांनी तिला जन्मच द्यायला नको होता. जबाबदारी पेलायची तयारी नसेल तर घ्यायची कशाला? आणि तुझ्या बहिणीच्या मुलीचा सांभाळ तुझ्या आई-वडिलांनी तरी का करायचा? तू बहिणीला मुलीला परत घेऊन जायला सांग नाहीतर म्हणाव मी घर सोडून जातो.”

त्याला ते तितकेसे पटले नसावे. थोड्या नाराजीनेच पुढचे काहीही न बोलता तो निघून गेला. माझ्या डोक्यातून मात्र तो विषय काही केल्या गेला नाही. झोपडपट्टी मध्ये रहाणा-या अनेक जणांच्याकडे हा प्रोब्लेम असतो. छोटी घरे,

एकाच घरात भरपूर माणसे, विसंगत परिस्थिती यामुळे त्या लोकांना आहे तसे जीवन जागावे लागते. मी स्वत: मध्यमवर्गीय कुटुंबातला असल्यामुळे या अडचणींची मला बऱ्यापैकी कल्पना आहे. मग मी विचार केला आपण झोपडपट्टी सुधारण्यासाठी काहीतरी करावे.

सर्वात पहिल्यांदा माझा पुणे महानगरपालिकेतला मित्र अमोल याला भेटलो. 'झोपडपट्टी पुनर्वसन' कार्यक्रम किंवा योजना काय आहे, ते समजावून घेतले. नंतर जवळच्या झोपडपट्टी मधून फिरून तिथल्या समस्या समजून घेतल्या. तिथे रहाणारे बरेच जन दुसरी काही सोय नसल्यामुळे नाईलाजाने तिथे राहतात, हे माझ्या लक्षात आले.

मग मी त्यांच्याशी मिटिंग ठरवून त्यांना 'झो. पु.' त्यांना माहिती देण्याचं ठरवलं. सुदैवाने सेनापती बापट रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला एका ठिकाणी या योजनेनुसार एका इमारतीचे बांधकाम सुरु झाले होते आणि मॉडेल कॉलोनीच्या कॅनॉल रोड वर सुद्धा एक इमारत बांधून तयार होती. तिकडून काही फोटो आणि काही लोकांचा मुलाखतीचे व्हीडीओ घेऊन मी एक पॉवर पॉइंट प्रेसेंटेशन बनवलं.

पहिल्या ठिकाणी मी घेतलेल्या मिटिंगसाठी लोकांची गर्दी चांगली होती पण मिटिंग नंतर लोकांनी मला सांगितले कि, त्या जागेचे मालक हे ती झोपडपट्टी उठवण्यासाठी कोर्टातून केस लढवणार आहेत. पण हे लोक जागा सोडणार नाहीत. सखल भागात असलेल्या या ठिकाणी पाण्याला चांगले प्रेशर आहे, इथपर्यंत पुणे स्टेशन, स्वारगेट  आणि शनिपार वरून बस येते, जागा भरपूर मोठी आहे, आता तर महानगर पालिकेने सार्वजनिक संडास पण बांधून दिलंय, असे अनेक कारणे त्यांनी मला दिली.

आता मी माझा मोर्चा त्या जागेचे मालक श्री. शेळके यांच्याकडे वळवला. मी त्यांना भेटण्यापूर्वी 'कशासाठी भेटायचं' हे सांगितले नाही. पहिल्या भेटीत त्यांनी कोर्टाकडून काय तो निर्णय येईपर्यंत थांबण्याचा सल्ला मला दिला. मग मी त्यांना दुसऱ्यांदा भेटलो आणि समजावून सांगितले कि, ते लोक जमिनीचा ताबा

सहजासहजी सोडणार नाहीत. समजा शासनाने त्या झोपडपट्टीला संरक्षण दिले तर सगळी जमीन हातातून जाईल, त्यापेक्षा एखाद्या बिल्डरला झो.पु. नुसार बांधकामासाठी अर्धी आणि त्याच्यासाठी अर्धी जमीन द्या तुम्हाला निदान काहीतरी फायदा होईल, निदान अर्ध्या जमिनीचा तरी.

माझे हे बोलणे त्यांना बहुतेक पटले असावे, पण त्यांनी ते लगेच मान्य केले नाही. मला दुसऱ्या दिवशी बोलावून घेऊन त्यांनी चौकशी केली कि, मी या जागेत इतका इंटरेस्ट का घेतोय? त्या लोकांना घरे बांधून मिळणार, पण मला काय मिळणार? वैगेरे. मग मी त्या बागेतल्या मुलाचा किस्सा त्यांना ऐकवला, त्याची अडचण, त्यावरचा उपाय इत्यादी बाबतीत सविस्तर बोलणे झालं आणि मग श्री. शेळके त्या जागेवर योजना राबवायला तयार झाले.

त्यानंतर सुद्धा अनेक जन सल्ला किंवा आर्थिक मदत मागायला माझ्याकडे येताच होते. एकदा तर आमच्या सोसायटीच्या कंपाउंड वॉलला एक ट्रक धडकला आणि भगदाड पडले. ते मी स्वखर्चाने दुरुस्त करून दिले, तर लोकांनी मला सोसायटीचा अध्यक्ष करून टाकले. मी लगेच राजीनामा देऊन साधे असे खजिनदार पद घेतले. सोसायटीला कुठे पैसे कमी पडले तर मी देईन, या अटीवर त्यांनी माझा राजीनामा स्वीकारून मला अध्यक्षा ऐवजी खजिनदार बनण्याची परवानगी दिली.

माझ्या एका चुलत मामाचा मुलगा एकदा रिक्षा घेण्यासाठी पैसे मागायला आला होता. मी त्याला इतके पैसे देऊ शकत नव्हतो आणि पुण्यात त्याने रिक्षा ऐवजी दुसरा धंदा करावा, असे माझे मत होते. पण त्याचे शिक्षण ७ वीच पर्यंत झाल्याने त्याने रिक्षासाठी हट्ट धरला. शेवटी असे ठरले कि मी त्याच्या सोबत शिर्डी येथे जायचे, एखादा रिक्षा त्याला शिफ्ट वरती मिळवून द्यायचा आणि त्याच्या राहण्या-खाण्याची सोय भक्तनिवास आणि प्रसादालयात करून द्यायची. त्याला थोडं हातभार म्हणून रू. ८,०००/- मी दिले आणि पुढचे सहा महिने त्याने पुण्यात नाही यायचे असे ठरले.

अशा रीतीने मी लोकांना येनकेन प्रकारे मदत करत होतो. माझ्या मुलीच्या वाढदिवशी मी आमच्या घराजवळ असणाऱ्या सरकारी शाळेत त्याच दिवशी वाढदिवस असणाऱ्या मुलींना कपडे भेट देत आलोय.

होता होता मी अगदी प्रत्येक गोष्टीसाठी लोकांना एक आधार वाटू लागलो. असाच एक दिवस घरी निवांत बसलो असताना आमच्या विद्यमान नगरसेवकांचा एक माणूस घरी आला. त्याने निरोप दिला कि, साहेबांनी मला त्याच दिवशी संध्याकाळी भेटायला बोलावले आहे.

नगरसेवकांच्या कार्यालयात मी पोहोचलो तसे त्यांनी जमलेल्या इतर लोकांना थांबण्याची सूचना केली आणि माझ्यासोबत तातडीची मिटिंग केली.

त्यांना अशी शंका आली होती कि मी येणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीची तयारी करत आहे का? झो. पु. योजना राबवून मी त्या नगरसेवकाच्या विरुद्ध वातावरण निर्मिती करतो आहे का? मला विरोधी पक्ष यासाठी आर्थिक पाठबळ देत आहे का?

त्यांच्या सगळया प्रश्नांची उत्तरे देऊन मी ती मिटिंग उरकून घरी आलो. जेवायला बसलो तितक्यात आमचे सोसायटी अध्यक्ष आझम शेख माझ्या घरी आले. त्यांनी नगरसेवक आणि माझ्यात काय बोलणे झाले याबद्दल विचारले. मी त्यांना सगळे सविस्तर सांगितले. हे ऐकून आझमभाई खूष होऊन मला म्हणाले, मग राहा कि निवडणुकीला उभा. तुला भरपूर मतं पडतील. आपण आपली माणसं लावू प्रचाराला.

त्या रात्री मी सुद्धा नगरसेवक होण्याचे स्वप्न रेखाटायला सुरुवात केली. तशी निवडणूक अजून जाहीर झालेली नव्हती पण पुढच्या एक ते दिड वर्षामध्ये ती होणार होती हे नक्की. आझमभाईंच्या म्हणण्यानुसार मी जिंकून आलो सुद्धा असतो आणि सोबतच आमच्या वॉर्डचा विकास करणे मला सोप्पे झालं असतं. पण मी

कुठल्याही पक्षातर्फे निवडणूक लढवू नये, तर अपक्ष लढावे असा प्रेमळ सल्ला आझमभाई दुसऱ्या दिवशी भेटले तेव्हा देऊन गेले.

नगरसेवक मला भेटले ही बातमी माझ्या अपेक्षेपेक्षा खूप लवकर सगळीकडे पसरली. आणि एके दिवशी मला फोन राज्यस्तरीय पक्षाच्या एका कार्यकर्त्याचा फोन आला. त्यानेदेखील भेटण्यासाठी यायचं आमंत्रण दिलं. असं एकूण ५ पक्षांकडून मला निवडणुकीची विचारणा झाली, पण माझं आर्थिक बळ कमी पडतंय हे लक्षात आल्यावर त्यांनी पुन्हा मला फोन केला नाही. अगदी गोरगरिबांचा म्हणून असलेला एक पक्ष माझ्या जातीच्या आधारावर मला तिकीट देऊ पहात होता. मग मी स्वत: ठरवलं की अपक्ष लढून काय होतंय, ते बघायचं.

मग सोसायटीमधल्या माझ्या अगदी जवळच्या लोकांसोबत मी एक मिटिंग घेऊन निवडणुकीबद्दल चर्चा केली. सगळे मला प्रचारासाठी मदत करायला तयार होते. कुणी pamplet, कुणी फ्लेक्स छापायची तयारी दाखवली. सोबत इतर एम.आय.जी. मधल्या लोकांना भेटून त्यांना याबद्दल सांगून त्यांची प्रचार करताना मदत घेण्याचे निलेशने सुचवलं.

आतापर्यंत मी बराच प्रसिद्ध झालो असल्याने, मी ज्या घरात जाईल तिकडं माझं स्वागतच झालं. आमच्या भागातल्या एच.आय.जी आणि एल.आय.जी. कॉलनी मधल्या सोसायटी अध्यक्षांची मी मुद्दाम वेगळी मिटिंग घेतली. यासाठी मी मनपाचा एक हॉल भाड्याने घेतला. झो.पु. योजना चालू होती तिथल्या लोकांना बोलावलं. पुन्हा एकदा पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन कि ज्यात मी कोण आहे, काय का सामाजिक कार्य केली आहेत, निवडणुकीनंतर वॉर्ड विकासासाठी काय योजना आहेत, हे त्यांना पटवून सांगितलं. मिटिंग नंतर चहा, नाष्टा दिला. तेव्हा लोकांनी मला भेटून आपापल्या सोसायटीमधल्या समासांचे पाढे वाचले. सोसायटीच्या जागेवर नवीन इमारत उभारणीसाठी कोणी बिल्डर भेटतोय का, ते विचारले. या सगळ्यातून माझ्या लक्षात आले कि या सोसायटीत रहाणारी एक पिढी आता उतारवयात चालली आहे आणि नव्या पिढीला नव्या घरांची ओढ आहे. प्रत्येकाला त्याच्या मनाला पटेल असे आश्वासन देऊन तो दिवस उरकला.

त्याच वर्षी आमच्या सोसायटीच्या गणपती उत्सवासाठी मी एका मराठी अभिनेत्याला एका संध्याकाळी आरतीसाठी आमंत्रित केले आणि तो आला देखील. त्यामुळे माझी फुल्ल हवा झाली. लोक आता मला अजून जास्त आदर देऊ लागले. हाच प्रकार नवरात्रीमध्ये, एका रात्री दांडीयाच्या वेळी मी एक प्रसिद्ध अभिनेत्री सोसायटीमध्ये घेऊन आलो. त्यामुळे तरुण मंडळी भलतीच खूष झाली.

माझ्या सगळ्या हालचालींवर विद्यामान नगरसेवक बारीक नजर ठेऊन होते. त्यांनी दिवाळी निमित्त घरी फराळ, मिठाई आणि फटाके पाठवून दिले आणि सोबत एक चिठ्ठी. त्यात लिहिले होते, ‘तुम्ही निवडणुकीची तयारी जोरात केली आहे. पण ती जिंकण्यासाठी पाहिजे तितका पैसा तुमच्याकडे नसल्याने तुम्हाला कुठलाच पक्ष तिकीट देत नाही हे समजले तेव्हा खूप वाईट वाटले. पुढच्या निवडणुकीत कदाचित मी हरलेलो असेल पण तुम्ही जिंकणार नाही याची मला खात्री आहे. तरीही तुम्ही प्रयत्न कमी पडू देऊ नका. त्या नंतरच्या निवडणुकीपर्यंत तुमची आर्थिक परिस्थिती सुधारो आणि तुम्ही त्या निवडणुकीत जिंकावे अशी शुभेच्छा.’

हे पत्र वाचल्यावर आझमभाई देखील विचारात पडले. मग त्यांनी शक्कल लढवली. मला त्यांच्या लोकांच्या मिटिंगमध्ये घेऊन गेले. औपचारिक ओळख झाल्यावर मला निवडणुकीसाठी पाठींबा देण्याचे त्यांनी आवाहन केले. त्या बदल्यात मी झो.पु. योजना राबवून जनवाडी मधील मुस्लीम बांधवांसाठी घरे बांधून द्यावीत असं त्यांनी सुचवलं.

लोक बोळवण म्हणून ‘हो’ म्हणतात पण ऐन वेळी काय होईल हे सांगणे फार कठीण असते, हे मला माहिती होते. न रहावून मी एक दिवशी आझमभाईना भेटून माझ्या मनातली चिंता सांगितली. तेव्हा त्यांनी देखील हे खूप अवघड काम असल्याचं सांगितलं. पण आता माघार घेऊन जमणार नव्हतं.

मग मी आझमभाईना माझ्या मनातला एक ‘प्लॅन’ सांगितला. त्यात रिस्क होती पण प्रसिद्धी आणि लोकांची सहानुभूती त्यातून भरपूर मिळणार होती. सुरुवातीला आझमभाई मला ती रिस्क घेऊ द्यायला तयार नव्हते. पण मी त्यांच्याशी अनेक वेळा त्या बाबतीत बोलल्यावर दोन ते अडीच महिन्यानंतर ते म्हणाले, ‘निर्णय तुझा आहे आणि जे होईल त्याला तू तयार असशील तर मी काय बोलणार?’

दरम्यान अजून दोन महिने उलटले. एप्रिल २०१६ मध्ये एके दिवशी माझ्यावर गोळीबार झाला आणि मी असा कायमचा अधू होऊन बसलो. माझं ‘प्लॅन’ फसला. मला पूर्ण खात्री होती कि माझ्यावर गोळीबार झाला हे समजल्यावर लोक माझा सहानुभूतीने विचार करतील, माझ्या पाठीशी उभे राहतील, निवडणुकीत मी या मुद्द्याचे भांडवल करून जिंकून येईल. पण ज्याला मी गोळी मारण्यासाठी सुपारी दिली होती त्याचा निशाणा थोडं चुकला आणि माझ्या वर्मी घाव बसून मी अपंग झालो.

माझ्या या ‘प्लॅन’ची कल्पना आझमभाई सोडले तर इतर कुणालाच नव्हती. म्हणून मला हॉस्पिटलमध्ये नेण्यापासून ते डिस्चार्ज मिळेपर्यंत ते सतत माझ्यासोबत होते. कदाचित त्यांना स्वत:लं अपराधी वाटत असेल.

मी घरी आल्यापासून ते रोज निदान अर्धा तास माझ्यासोबत बसून गप्पा मारतात. मला तब्येतीची काळजी घ्यायला सांगतात, कधीतरी औषध देतात. चेकअप साठी हॉस्पिटलला मी त्यांच्याच रिक्षामधून जातो. तेव्हा ते आमच्या भागात नवीन काय चालू आहे, ते मला सांगतात. आम्ही त्या ठिकाणी जातो देखील. पण मला रिक्षामधूनच ते बघता येतं.

आता तर मला कायम एकच भीती वाटते की एखादा रात्री झोपेत असताना मी मेलो तर माझ्या मुलीचं आणि बायकोचं काय होणार? मी अगदी भरपूर पैसे कमावून ठेवलेले नाहीत. माझ्या मुलीला मी फिल्म डायरेक्टर बनवायचं ठरवलं आहे. बायकोला सांगून ठेवलंय की मला काहीही त्रास व्हायला लागला तर

लगेच ससून हॉस्पिटल मध्ये घेऊन जायचे. महागड्या हॉस्पिटलमध्ये नको, तितके पैसे नाहीत आता शिल्लक.

गेल्याच महिन्यात बायकोने टायपिंगचा क्लास लावलाय. तिला सांगितलं बाई मी बोलतोय तसं टाईप कर आणि मग मी एखाद्या चित्रपट निर्मात्याला त्याच्यावर सिनेमा बनवायला तयार करतो. शक्य तितके जास्त पैसे कमवून ठेवतो. जिवंत आहे तो पर्यंत लेखन थांबता कामा नये.

## समाप्त

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्‍यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद

जगाला दाखवू.

"Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow."

– Oliver Wendell Holmes

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.